# होमिओपॅथिक डॉक्टर्सचा विधानभवनावर विराट मोर्चा

नागपूर(प्रतिनिधी) होमिओपॅथिक डॉक्टर्स अन्याय निवारण संघर्ष समिती, महाराष्ट्र या संस्थेच्या वतीने बुधवारी (११) विविध प्रलंबित मागण्यांसाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान विधान भवनावर विराट मोर्चाचे व बेमुदत उपोषण आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनात आमदार प्रशांत ठाकुर सहभागी झाले होते, यावेळी बुलढाण्यातील चिखलीचे आमदार राहुल बोंद्रे, डॉ.आशिष गांधी, डॉ. अमित मयेकर, डॉ.विनित गुरमे, डॉ.लक्ष्मण आवटे, डॉ.अमोल देसाई, डॉ.मिलींद घरत, डॉ.जी.जी.पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

होमिओपॅथिक डॉक्टर्सच्या विविध मागण्यांच्या संदर्भात मागील ३० वर्षापासून होमिओपॅथिक डॉक्टर्सच्या विविध संघटनांनी शासन दरबारी अनेक आंदोलन, धरणे, निवेदन, मोर्चा याद्वारे सरकारचे वारंवार लक्ष वेधले. परंतू दुर्देवाने त्याची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे सिंधुदुर्गपासून गडचिरोली पर्यंत संपुर्ण महाराष्ट्रातील जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय संघटना, होमिओपॅथिक डॉक्टर्स, विद्यार्थी, शिक्षक, कॉलेज व्यवस्थापन यांचे सर्व प्रतिनिधी व पदाधिकारी होमिओपॅथिक डॉक्टर्स अन्याय निवारण संघर्ष समिती, महाराष्ट्र या एकाच झेंडयाखाली हिवाळी अधिवेशनादरम्यान नागपूर येथील विधान भवनावर एकत्रितपणे लढा देण्याचा निर्णय घेवून आंदोलनात सहभागी झाले होते.

शासन दरबारी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली विविध मागण्या मांडण्यात आल्या यात महाराष्ट्रातील होमिओपॅथिक डॉक्टरांना रूग्ण हिताच्या दृष्टीने आवश्यक तेथे ॲलोपॅथिक चिकित्सापध्दतीचा वापर करण्यास परवानगी देणेबाबत राज्य शासनाने विधीमंडळात जाहीर केलेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी, सार्व जनिक आरोग्य व्यवस्थेमध्ये होमिओपॅथिक चिकित्सा पध्दतीचा समावेश करावा, NRHM मध्ये कार्यरत असणाऱ्या होमिओपॅथिक डॉक्टरांची संख्या, वेतन व मानधन इतर राज्याप्रमाणे मिळावे, विधीमंडळ कायद्यानुसार होमिओपॅथिक डॉक्टरांना प्राप्त झालेले अधिकार हिरावून घेणारी राज्यशासनाची परिपत्रके रद्द करून RTO¸ विमा ईत्यादी क्षेत्रामध्ये फिटनेस सर्टिफिकेट देण्याबद्दल अधिकार बहाल करावेत, B.H.M.S. विद्यार्थ्यांना आंतरवासीयता काळामध्ये व MD करीत असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळावे, महाराष्ट्र राज्यामध्ये होमिओपॅथी करीता स्वतंत्र संचालनालय निर्माण करावे, होमिओपॅथिक चिकित्सकांवर दाखल केलेले खटले परत घ्यावेत या मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे. दरम्यान होमिओपॅथिक डॉक्टरांनी ९ डिसेंबर पासून आपले दवाखाने बंद ठेवावे तसेच आरएमओनी रूग्णालयातील सेवेत रूजू होवू नये असे सर्व होमिओपॅथिक डॉक्टरांना समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.